गुरुवार दि. ०१ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### कामगारांच्या व्यथा ऐकल्या, शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी; जिल्हाधिकारी मित्तल थेट बांधावर

## ‘शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये; संकटाच्या काळात प्रशासन पाठीशी’ : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



**जालना -प्रतिनिधी**

**ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी अंबड महसूल उपविभागाच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत ऊसतोड कामगार समस्या निराकरण व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी शिबिराला भेट देऊन कामगार, विद्यार्थी व शेतकऱ्यांशी संवाद साधला. शिबिराचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी केले. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, कुपोषण, महिलांचे आरोग्य, घरकुल तसेच विविध शासकीय कागदपत्रे व योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी त्यांनी मांडल्या. कामगारांना जातीचे दाखले, रेशन कार्ड, आधार कार्ड तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत असल्याचे पारधी यांनी यावेळी सांगितले. हे शिबिर केवळ एक दिवसापुरते मर्यादित न राहता कामगारांच्या प्रश्नांवर पुढील काळातही प्रशासनाकडून काम केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**




ऊसतोडीसाठी जिल्ह्याबाहेर किंवा अन्य ठिकाणी स्थलांतर करण्यापूर्वी कामगारांनी जिल्हा प्रशासनाने विकसित केलेल्या ‘ऊस मित्र’ ॲपवर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच, कामावर जाण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीमध्ये स्थलांतराची नोंद करावी, असेही सांगण्यात आले. कामगारांची नोंद प्रशासनाकडे उपलब्ध झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत शासकीय योजना, मदत आणि आवश्यक सेवा पोहोचविणे सोपे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिबिरात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ऊसतोड महिलांशी संवाद साधला. ऊसतोडीसाठी होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी महिलांनी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार सुरू करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. अल्प कालावधीत मोठ्या संख्येने कामगारांना एकत्र करून शिबिराचे आयोजन केल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी आणि त्यांच्या पथकाचे कौतुक केले.

शिबिरानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी अंबड शहरातील ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या शाळा व वसतिगृहाला भेट दिली. तेथील सुमारे १०० विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था तसेच इतर सुविधांची त्यांनी पाहणी केली. विद्यार्थ्यांनी शिक्षणावर लक्ष केंद्रित करून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षिका डॉ. कविता गित्ते यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण प्रभावित होऊ नये, यासाठी पालकांनी विशेष लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले.

शिबिरानंतर जिल्हाधिकारी मित्तल यांनी अंबड तालुक्यातील धनगर पिंप्री शिवाराला भेट देऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. पावसाअभावी तालुक्यात निर्माण झालेल्या परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला. शेताच्या (पान २ वर)

## वीजग्राहकांसाठी ‘सेवा सेतू’व ‘सेवा संकल्प अभियानाला प्रारंभ

### महावितरणचा प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष

**जालना - प्रतिनिधी**

वीजग्राहकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्यासाठी जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात महावितरणकडून ‘सेवा सेतू’आणि ‘सेवा संकल्प अभियान’सुरू करण्यात आले आहे.

सेवा संकल्प अभियान अंतर्गत जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष सुरू करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या अंतर्गत जागेवरच ऑनलाईन अर्ज नोंदणी, योजनेचे आर्थिक फायदे व सौर संच बसविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, कर्जाची सुविधा, अंदाजित खर्च यासाठी स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवडसूचीवरील सौर कंत्राटदार प्रतिनिधींशी थेट संपर्क व समन्वय करण्यात येत आहे. कर्जाची देखील सुविधा उपलब्ध होत आहे. यासह सौर योजनांची माहिती देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच त्रुटींची पुर्तता करून प्रलंबित अर्जांवर त्वरित कार्यवाही करण्यात येत आहे.

या सेवा सेतू अभियानात नवीन घरगुती वीजजोडणी देणे, नादुरुस्त रोहित्र (पान २ वर)

## मंगळबाजारात मटका जुगाराचा पर्दाफाश; तिघे ताब्यात

### दोन जण मटका खेळताना व खेळविताना आढळले; बुकी शिवलिंगआप्पा वीर पोलिसांच्या ताब्यात, ५१ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मंगळबाजार परिसरात सुरू असलेल्या मटका जुगारावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत दोन जणांसह एका मटका बुकीला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण ५१ हजार ७७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई बुधवारी, दि. ३० सप्टेंबर रोजी करण्यात आली. जालना जिल्ह्यात मटका जुगार




खेळणाऱ्या तसेच मटका जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आवश्यक सूचना देऊन अशा प्रकारच्या अवैध जुगाराच्या ठिकाणांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते.

बुधवारी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या व्यक्तींची माहिती घेत असताना मंगळबाजार परिसरात काही व्यक्ती मटका जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करून पथकाने संबंधित ठिकाणी शोध घेतला. यावेळी सुनिल लिंबाजी सोनटक्के (वय ५१, रा. कोष्टी गल्ली, काद्राबाद, जालना) आणि शेख रशिद शेख बाबू (वय ३८, रा. मंगळबाजार, जालना) हे मटका जुगार खेळताना व खेळविताना आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान संबंधित मटका जुगाराचा (पान २ वर)

## ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत योग व ध्यान शिबिर उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात सेवा, समर्पण आणि समाजकल्याणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने अंतर्गत जिल्हा प्रशासन जालना यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालाय येथे योग व ध्यान शिबिर आज (दि.३०) रोजी उत्साहात पार पडले. या उपक्रमात निरोगी आरोग्यासाठी योग आणि ध्यान याचे दैनंदिन जीवनातील मार्गदर्शन करुन प्रात्यक्षिक करण्यात आले.



या योग व ध्यान शिबिराचे अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे, पतंजली योग समितीचे योगसाधक प्रल्हाद हरबक यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी, विविध कार्यालयांतील कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

योगसाधक प्रल्हाद हरबक यांनी योग व ध्यान ही केवळ व्यायामाची पद्धत नसून निरोगी, शिस्तबद्ध आणि सकारात्मक जीवन जगण्याची संस्कृती असल्याचे सांगत, दैनंदिन जीवनात योग व ध्यानाचा अंगीकार करून निरोगी समाजनिर्मितीस हातभार लावावा असे मार्गदर्शन केले. शिबिराच्या प्रारंभी उपस्थितांना योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावून सांगण्यात आले. योग प्रशिक्षकांनी (पान २ वर)

## जालना जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’तून आरोग्य जनजागृती

### *शाळांमध्ये लसीकरण, गर्भवतींचे समुपदेशन; एचपीव्ही लसीकरणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन*

**जालना - प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत जालना जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून आरोग्य, लसीकरण, मातृ आरोग्य, पोषण तसेच गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत नागरिक आणि



विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत जिल्ह्यात विविध आरोग्य विषयक उपक्रम घेण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यात शाळा तसेच आरोग्य केंद्रांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दासला येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. हिना नवाब आणि डॉ. बिलाल यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. या उपक्रमात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना टीडी () लस देण्यात आली. यामध्ये ८४ मुला-मुलींना टीडी लसीचा लाभ मिळाला. किशोरवयीन विद्यार्थ्यांना (पान २ वर)

## जालना जिल्ह्यात चारा वाहतुक व विक्रीस बंदी

### *हिरवा चारा, कडबा, कुट्टी, पेंढा, टीएमआरसह पशुखाद्याच्या वाहतुकीवर निर्बंध; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश*

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत ‘ट्रिगर-१’ (प्रथम टप्पा) दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उपलब्ध असलेला चारा बाहेर जाण्यापासून रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्याच्या हद्दीतून अन्य जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर कोणत्याही प्रकारचा सुका अथवा ओला चारा वाहतूक करून नेण्यास तसेच विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ () मधील कलम १६३ अन्वये याबाबत आदेश काढला आहे. हा आदेश ३० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहणार आहे.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करता स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेला चारा मोठ्या प्रमाणावर इतर जिल्ह्यांत किंवा सीमावर्ती भागात विक्रीसाठी पाठविला जाऊ शकतो. त्यामुळे जालना जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होऊन चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत पशुधनाच्या जीविताला धोका निर्माण होण्याबरोबरच त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे चाऱ्याची वाहतूक रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या आदेशानुसार हिरवा चारा, कडबा, कोणत्याही प्रकारची कुट्टी, पेंढा, टीएमआर व इतर प्रकारचे पशुखाद्य जिल्ह्याबाहेर नेता येणार नाही. या वस्तूंची जालना जिल्ह्याच्या हद्दीतून अन्य जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर वाहतूक करण्यास आणि विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाने अधिकृत मंजुरी दिलेल्या चारा वाहतुकीला मात्र हा आदेश लागू राहणार नाही. संबंधित विभागाची अधिकृत परवानगी असल्यास अशा वाहतुकीस नियमांनुसार मुभा राहणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय (पान २ वर)

## तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन

### *अंतरीक्ष करिअर अकॅडमीचा उपक्रम; तळणी फाटा ते ठेंगे वडगाव मार्गावर स्पर्धा*

**मंठा - प्रतिनिधी**

अंतरीक्ष करिअर अकॅडमीच्या वतीने बुधवार (दि. ३०) भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तळणी फाटा ते ठेंगे वडगाव या मार्गावर झालेल्या स्पर्धेचा शुभारंभ शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते (पान २ वर)



# जालना मनपाची धडक कारवाई; रेल्वे स्टेशन रोडवरील ७० अनधिकृत टपऱ्या हटविल्या

## गोकुळधाम सहकार कॉलनीतील ३ शेडही जमीनदोस्त; १ जेसीबी व २ ट्रॅक्टरच्या सहाय्याने अतिक्रमण हटाव मोहीम

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा धडक मोहीम हाती घेतली आहे. महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी रेल्वे स्टेशन रोड परिसर आणि गोकुळधाम सहकार कॉलनी परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल ७० अनधिकृत टपऱ्या आणि ३ अनधिकृत शेड हटविण्यात आले. महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. कारवाईसाठी १ जेसीबी आणि २ ट्रॅक्टर तैनात करण्यात आले होते. अचानक झालेल्या या कारवाईमुळे संबंधित परिसरातील रस्ते व पदपथ मोकळे झाले असून, नागरिकांची ये-जा आणि वाहतुकीला निर्माण होणारे अडथळे कमी होण्यास मदत झाली आहे.



**रेल्वे स्टेशन रोडवरील ७० टपऱ्यांवर कारवाई**

रेल्वे स्टेशन रोड हा शहरातील महत्त्वाचा मार्ग असून या परिसरात विविध प्रकारच्या टपऱ्या व अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांमुळे सार्वजनिक जागेचा वापर होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार मनपाच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करत ७० अनधिकृत टपऱ्या हटविल्या.

सार्वजनिक रस्ते आणि पदपथ मोकळे ठेवणे तसेच वाहतुकीस अडथळा होणार नाही, यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**गोकुळधाममध्येही तीन शेड हटविले**

रेल्वे स्टेशन रोडसोबतच गोकुळधाम सहकार कॉलनी परिसरातही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी सार्वजनिक जागेवर उभारण्यात आलेली तीन अनधिकृत शेड हटविण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने ही बांधकामे निष्कासित करण्यात आली.

**पुन्हा अतिक्रमण केल्यास थेट दंडात्मक कारवाई**

दरम्यान, अतिक्रमण हटविल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना महापालिका प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे. हटविण्यात आलेल्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण आढळल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यानुसार कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

याशिवाय अतिक्रमण हटविण्यासाठी महापालिका प्रशासनाला जो खर्च आला आहे, तो संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**टपऱ्या, हातगाड्या लावून रस्ता अडवू नका**

शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांनी सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच शासकीय जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये, असे आवाहन महापालिकेने केले आहे. अनधिकृत टपऱ्या किंवा हातगाड्या लावून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नये. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

**अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कारवाई**

सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत ही अतिक्रमण हटाव मोहीम पार पडली. यावेळी अतिक्रमण विभाग प्रमुख शोएब खान यांच्यासह कादर खान, आमेर खान, किरण प्रधान, अरुण वानखेडे, श्रावण सराटे, सतीश ढक्का तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारवाईदरम्यान मनपाच्या यंत्रणेकडून एक जेसीबी आणि दोन ट्रॅक्टर वापरण्यात आले.

**प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणांवर कारवाई सुरूच राहणार**

जालना शहरातील प्रमुख रस्ते, सार्वजनिक जागा आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेची मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. अतिक्रमण करून सार्वजनिक वाहतूक व नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई केली जाणार आहे.

विशेष म्हणजे, अतिक्रमण हटविण्याची कारवाई झाल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून संबंधित ठिकाणी लक्ष ठेवण्याची गरजही निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील काळात मनपाची कारवाई केवळ अतिक्रमण हटविण्यापुरती मर्यादित राहणार की, हटविलेल्या जागांवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी नियमित देखरेख केली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. महापालिका प्रशासनाने नागरिक व व्यावसायिकांना नियमांचे पालन करून सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# परतूरमध्ये सुरों की शाम लता जी के नाम करा ओके संगीत महफील उत्साहात संपन्न!



**परतूर - प्रतिनिधी**

लायंस क्लब ऑफ परतूर आणि दृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक योगानंद माध्यमिक विद्यालय येथे 'सुरों की शाम लता जी के नाम' या भव्य कराओके संगीत महफिलीचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुमधुर गाण्यांनी आणि स्थानिक गायकांच्या सुरांनी ही संध्याकाळ परतूरकरांसाठी अविस्मरणीय ठरली.

कार्यक्रमाचे उद्घाटन योगानंद माध्यमिक विद्यालयाचे संस्थापक आदरणीय मनोहरराव पेडगांवकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी लायंस क्लबचे अध्यक्ष महेश होलाणी, सचिव कैलास तांगडे, कोषाध्यक्ष नरपत जांगिड़, प्रकल्प प्रमुख मनीषा कदम आणि सरिता उबाळे,दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर खालापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. या संगीत स्पर्धेत अनेक गायकांनी लतादीदींची अजरामर गाणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत सुवर्णा ढवळकर यांनी प्रथम बक्षीस पटकावले. द्वितीय बक्षीस संयुक्तपणे सुलोचना शिळवणीकर व आदिती काटे यांना देण्यात आले, तर तृतीय बक्षीस सुलोचना काटे यांनी मिळवले. विजेत्यांना अनुक्रमे २१००/-, १५००/- आणि ११००/- रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या पारितोषिकांचे सौजन्य मनोहर खालापुरे, प्रा. दिनकर टकले आणि तुकाराम उबाळे यांनी केले होते.

**बहारदार संचालन ठरले मुख्य आकर्षण**

या संपूर्ण कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे शिल्पा होलाणी व महेश होलाणी यांचे बहारदार आणि अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन. संचालन करत असताना त्यांनी लतादीदींच्या जीवनप्रवासातील अनेक भावूक, प्रेरणादायी आणि रंजक प्रसंग श्रोत्यांसमोर मांडले. त्यांच्या या संवादात्मक आणि सुरील्या संचालनाने संपूर्ण महफिलीची रंगत द्विगुणित केली.

**मान्यवरांची अथांग उपस्थिती**

यावेळी लायंस क्लबचे सदस्य परेश पाटील, पुष्पा पाटील, संजीवनी खालापूरे, अशोक उबाळे, भानुदास कदम, तुकाराम उबाळे, पुरुषोत्तम राठी, डॉ. भक्ती नंद, शोभा टकले, रेवती राखे, रोहिणी बहिवाळ, विश्वंभर बहिवाळ, मुकुंद शेपाळ, ज्योती उबाळे, प्रमोद टेकाळे तसेच शहराचे प्रतिष्ठित नागरिक बाबासाहेब कवडे, रवींद्र जोशी, आशिष कन्सल, दिगंबर लिपणे, सिद्धार्थ कुलकर्णी, शिल्पा मालपाणी ,मंजुषा होलानी,कराओके क्लबचे सर्व सदस्य आणि परतूरमधील शेकडो संगीतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी अतोनात परिश्रम घेतले.

## रितू लोदवाल विभागीय क्रीडा स्पर्धेत प्रथम ..

**जालना - प्रतिनिधी**

दि. २४ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे विभागीय स्तरावरील वुशू स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.सदरील स्पर्धेत जे ई एस महाविद्यालयाची १२ वी वाणिज्य वर्गातील विद्यार्थिनी कु.रितू संजय लोदवाल हिने ७५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला व तिची राज्यस्तरीय वुशू क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली.याबद्दल जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया,संस्थेचे सचिव श्रीनिवासजी भक्कड,प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री,उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले,डॉ.हेमंत वर्मा,प्रबंधक बाबाजी सोळुंके आदींनी अभिनंदन केले.

# पाहेगावजवळ बोलेरोतून दारूची चोरटी वाहतूक; ७.०६ लाखांचा मुद्देमाल जप्त

## सेवली पोलिसांची मध्यरात्री धडक कारवाई; देशी दारूच्या १,९२० बाटल्यांसह बिअर व विदेशी दारू जप्त

**जालना । प्रतिनिधी**

सेवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना देशी व विदेशी दारूची चोरटी विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पाहेगाव गावाजवळ पोलिसांनी छापा टाकून देशी दारूच्या तब्बल १,९२० बाटल्या, बिअरच्या बाटल्या, विदेशी दारू तसेच दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली बोलेरो गाडी, असा एकूण ७ लाख ६ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी सेवली पोलिसांनी सोनू अशोक जैस्वाल (रा. नेर, ता. जालना) आणि शबीर नुर शेख (वय ३२, रा. नेर, ता. जालना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**पाहेगावजवळ रात्री छापा**

पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू तसेच अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सेवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग देवसिंग साबळे यांना पाहेगाव गावाजवळ एक इसम बोलेरो वाहनातून विनापरवाना दारू विक्रीसाठी घेऊन येत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पाहेगाव गावाजवळ सापळा रचून दि. २७ सप्टेंबर रोजी रात्री १०.२० वाजता संशयित वाहनावर छापा टाकला. यावेळी पांढऱ्या रंगाची बोलेरो क्रमांक एमएच-३७-व्ही-४७२५ आढळून आली. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात दारूचा साठा आढळून आला. पोलिसांच्या तपासणीत खाकी रंगाच्या ४० बॉक्समध्ये 'देशी सखु संत्रा' लेबल असलेल्या देशी दारूच्या एकूण १,९२० बाटल्या आढळून आल्या. प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बाटल्या असून प्रत्येक बाटलीची क्षमता १८० एमएल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या देशी दारूची अंदाजे किंमत १ लाख ५३ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय एका खाकी रंगाच्या बॉक्समध्ये बिअरच्या १२ बाटल्या आढळून आल्या. त्यांची किंमत २ हजार ४६० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच .१ या लेबलच्या १८० एमएल क्षमतेच्या तीन सीलबंद विदेशी दारूच्या बाटल्या पोलिसांना मिळून आल्या. या दारूची किंमत ६३० रुपये असल्याचे पोलिसांच्या पंचनाम्यात नमूद आहे. दारूसाठ्यासोबतच पोलिसांनी दारू वाहतुकीसाठी वापरली जात असल्याचे नमूद केलेली महिंद्रा कंपनीची बोलेरो गाडी (एमएच-३७-व्ही-४७२५) जप्त केली. वाहनाची अंदाजे किंमत ५ लाख ५० हजार रुपये आहे. दारू व वाहन मिळून पोलिसांनी एकूण ७ लाख ६ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईप्रकरणी सेवली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक १६१/२०२६ दाखल करण्यात आला आहे. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५(अ) व ६५(ई) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

# मुंबई महानगरपालिका सचिव कार्यालयातील लक्ष्मीकांत मोरे सेवा निवृत्त

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिका सचिव कार्यालयातील कर्मचारी श्री लक्ष्मीकांत यशवंत मोरे महानगरपालिकेची २७ वर्षे सेवा पूर्ण करून दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त होत आहेत.सचिव कार्यालयाच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. मोरे यांनी सचिव कार्यालयातील विविध विभागांतील कामकाज अनुभव आहे.त्यांचा सेवेतील प्रामाणिकपणा हाच त्यांचा यशाचे गमक आहे.मोरे उत्कृष्ट



क्रिकेट खेळाडू आहेत. महानगरपालिका खात्यांतर्गत क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होत असत.दिनांक सात ऑक्टोबर १९९८ रोजी महानगरपालिकेच्या सेवेत दाखल झाले होते.मोरे कोकणचे सुपुत्र आहेत त्यांनी सेवा निवृत्ती नंतर आपल्या चिपळूण सावर्डे - मुंडे येथील गावात येऊन फळ लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे.हापूस आंबा - काजू फळांची लागवड त्यांनी केली आहे.

मोरे, यांच्या कार्यालयातील समाजसेवी वृत्ती वाखाणण्याजोगी आहे.संकटात कोणाच्या ही मदतीला धावून जाणे हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे.मोरे यांच्या सेवा निवृत्त दिनानिमित्त शुभेच्छा.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# सोशल मीडियावरचे श्रीमंतीचे प्रदर्शन ठरू शकते धोकादायक!

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आनंदाचे क्षण, कौटुंबिक समारंभ, पर्यटन, सण-उत्सव, वाढदिवस किंवा एखादे यश मिळाले की त्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्याची सवय अनेकांना लागली आहे. मात्र, सोशल मीडियावर व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य आणि वैयक्तिक सुरक्षितता यामध्ये योग्य समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बातमीत सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या माहितीचा गैरफायदा घेत घरात चोरी झाल्याचे समोर आले आहे. ही घटना सोशल मीडिया वापरकर्त्यांसाठी निश्चितच सावध करणारी आहे.

आज अनेकजण आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन सोशल मीडियावर करतात. महागडे दागिने, रोकड, आलिशान घर, नवीन वाहन, परदेशातील प्रवास, घरातील मौल्यवान वस्तू, मोठ्या समारंभातील खर्च यांचे फोटो आणि व्हिडिओ सर्रास प्रसिद्ध केले जातात. आपल्याला हे केवळ आनंदाचे प्रदर्शन वाटत असले तरी गुन्हेगारांसाठी ही माहिती महत्त्वाची ठरू शकते. एखादी व्यक्ती घराबाहेर गेल्याचे किंवा काही दिवस पर्यटनासाठी गेल्याचे सोशल मीडियावर जाहीर केल्यास त्या व्यक्तीचे घर रिकामे असल्याची माहिती अनोळखी व्यक्तींना सहज मिळू शकते. त्यामुळे चोरी, फसवणूक किंवा इतर गैरप्रकारांना अप्रत्यक्षपणे संधी मिळू शकते. विशेषतः लहान मुले, कुटुंबातील सदस्य, घराचा पत्ता, शाळेचे नाव, रोजची दिनचर्या, कार्यालयाची माहिती, प्रवासाचे वेळापत्रक किंवा आपण सध्या कुठे आहोत, याची माहिती सार्वजनिकपणे देणे टाळले पाहिजे. कौटुंबिक वाद, आर्थिक व्यवहार, वैयक्तिक कागदपत्रे, मोबाईल क्रमांक, ओळखपत्रे, बँकविषयक माहिती यांसारख्या गोष्टी सोशल मीडियावर शेअर करणेही धोकादायक ठरू शकते.

सोशल मीडिया वापरताना काही साध्या पण महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. सोशल मीडिया खात्यांची तपासावीत. अनोळखी व्यक्तींच्या किंवा स्वीकारू नयेत. मजबूत पासवर्ड आणि दोन-स्तरीय सुरक्षा (- ) वापरावी. संशयास्पद लिंक, संदेश किंवा ऑफरवर क्लिक करू नये. आपले फोटो आणि माहिती कोण पाहू शकते, यावर नियंत्रण ठेवावे. विशेषतः प्रवासाची माहिती प्रवासाला निघण्यापूर्वी किंवा आपण घराबाहेर असतानाच सार्वजनिक करण्याऐवजी परतल्यानंतर शेअर करणे अधिक सुरक्षित ठरू शकते. सोशल मीडिया हा माहिती, संवाद आणि मनोरंजनाचा प्रभावी माध्यम आहे; मात्र त्याचा वापर विवेकाने झाला पाहिजे. 'दाखवण्यापेक्षा सुरक्षित राहणे महत्त्वाचे' हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्याच्या नादात आपल्या घराची, संपत्तीची आणि कुटुंबाची सुरक्षितता धोक्यात येणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक वापरकर्त्याची जबाबदारी आहे. डिजिटल जगात सावधगिरी हीच खरी सुरक्षा आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# अक्षरवैभव साहित्य संमेलनातील गझल मुशायऱ्याने रंगली साहित्यिक संध्या कसा धरू मी नेम तुझ्यावर, अजून आहे प्रेम तुझ्यावर...

**जालना - प्रतिनिधी**

कै.डॉ. सुभाषराव ढाकणे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना संचलित डॉ. सुभाषराव ढाकणे महाविद्यालय, माऊली प्राशासकीय सेवा वरिष्ठ महाविद्यालय, जालना आणि अक्षरवैभव साहित्य परिषद, शाखा जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय अक्षरवैभव साहित्य संमेलनातील गझल मुशायऱ्याने जालनेकरांची साहित्यिक संध्या चांगलीच रंगून गेली. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यानंतर बहारदार गझल मुशायऱ्यालाही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या गझल मुशायऱ्याचे अध्यक्षस्थान लातूर येथील गझलकार योगिराज माने यांनी भूषविले. यावेळी डॉ. इकबाल मिन्ने, सुधीर मुळीक, डॉ. शुभांगी कुलकर्णी, अविनाश कासांडे, राजू आठवले, राना दौंड, यशवंत म्हस्के, आत्माराम जाधव, गिरीश जोशी, आत्तम गेंदे आणि डॉ. राज रणधीर आदी गझलकारांनी आपल्या दर्जेदार गझलांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रेमभावनेपासून विरहाच्या वेदनेपर्यंत आणि सामाजिक वास्तवापासून मानवी स्वभावाच्या विविध पैलूंपर्यंत अनेक विषयांना गझलकारांनी आपल्या शेरांतून प्रभावीपणे अभिव्यक्त केले. डॉ. स्वाती भद्रे यांनी असा ना एकदा वा दोनदा तो सारखा होतो, तुला पाहून का माझा गुलाबी चेहरा होतो'' या शेरातून प्रेमभावनेची नाजूक अनुभूती व्यक्त केली. डॉ. शुभांगी कुलकर्णी यांच्या मनाची पानगळ झाल्यावरी हमखास आठवतो मला सोडून गेलेला तुझा मधुमास आठवतो या शेरातून विरह आणि आठवणींची हळवी किनार जाणवली. आत्माराम जाधव यांनी बालपणीच्या



आठवणींना उजाळा देताना बर्फ गोळा मला खूप पोळायचा माय जेव्हा जुनी नोट मोडायची या शेरातून आईच्या कष्टांचे आणि जुन्या आठवणींचे भावविश्व उभे केले. गिरीश जोशी यांचा गुलाबी गुलाबी हवा होत आहे तुझ्या आठवांचा थवा होत आहे हा शेर प्रेम आणि स्मरणरंजनाची अनुभूती देऊन गेला. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या ममता सिंधुताई सपकाळ यांच्या कसा धरू मी नेम तुझ्यावर अजून आहे प्रेम तुझ्यावर या ओळींना रसिकांची उस्फूर्त दाद मिळाली आणि वंस मोअर वंस करून रसिकांनी अक्षरशः संमेलनस्थळ दणाणून सोडला. सामाजिक वास्तवावर भाष्य करताना सुधीर मुळीक यांनी या सर्कशीत बसलो हरवून चेहरा मी नंतर दिला जगाने दर्जा विदूषकाचा असा आशयपूर्ण शेर सादर केला. जात-धर्माच्या भिंतींवर भाष्य करताना राजू आठवले यांनी भिंत ना तोडू शकलो आम्ही जातीधर्माची मी मग झालो दुसऱ्याचा अन् तीही दुसऱ्याची असा संवेदनशील शेर मांडला. राना दौंड यांनी जीवनाच्या अंतिम सत्याकडे निर्देश करणारा जगतो आहे बदलून नवे रोजच कपडे तुला जायचे येथून आहे फक्त नागडे हा शेर सादर केला. व्यवस्थेवरील उपरोधिक भाष्य करत यशवंत म्हस्के यांनी व्यवस्थेच्या कुटनीतीला निखळ समजले जावे फतवा काढा नव्यापिढीला झुरळ समजले जावे असा परखड शेर ऐकविला. अविनाश कासांडे यांच्या तिच्या आठवांचा असा पूर येतो हळूवार होती असा सूर येतो या शेरातून आठवणींची हळुवार अनुभूती उमटली. आत्तम गेंदे यांनी आपल्या खास उपरोधिक शैलीत इकडून तिकडे लुडबुड करतो आहे चमचा पातेल्यावर हक्क सांगतो आहे चमचा असा राजकीय-सामाजिक आशयाचा शेर सादर केला. मुशायऱ्याचे अध्यक्ष असलेल्या योगिराज माने यांचा जे हवे ते सर्वकाही मिळत नाही नेमके हे माणसाला कळत नाही हा जीवनाचे वास्तव सांगणारा शेर ठरला. डॉ. इकबाल मिन्ने यांनी वेळ दिलेली पाळत जाणे सोपे नसते पंढरपूरला चालत जाणे सोपे नसते या शेरातून अनुभव आणि जीवनप्रवासाचे संदर्भ मांडले. तर डॉ. राज रणधीर यांच्या तुला जी पाहिजे आहे तुला मिळणार नाही ती तुला मिळणार आहे जी तुला रुचणार नाही ती या शेराने मानवी अपेक्षा आणि वास्तव यातील अंतर अधोरेखित केले. जवळपास प्रत्येक शेराला आणि गझलकाराला रसिक उस्फूर्त दाद देत गेले .गझलेच्या माध्यमातून प्रेम, वेदना, आठवणी, सामाजिक विसंगती आणि जीवनवास्तव यांचे दर्शन घडवत गझलकारांनी जालन्याच्या साहित्यिक वातावरणात एक वेगळीच रंगत निर्माण केली . डॉ राज रणधीर यांच्या उस्फूर्त आणि प्रासंगिक सूत्रसंचालनाने मुशायरा रंगला. या कार्यक्रमास साहित्यिक, कवी, गझलकार, शिक्षक, विद्यार्थी तसेच साहित्यप्रेमी रसिकांची मोठी उपस्थिती होती.

# धुळेच्या महापौर मायादेवी परदेशी यांची जालना महापौर वंदना मगरे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

## दोन्ही महापौरांमध्ये शहर विकास, नागरी सुविधा आणि महिला-दिव्यांगांसाठीच्या उपक्रमांवर चर्चा; वंदना मगरे यांच्याकडून मायादेवी परदेशी यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी**

धुळे महानगरपालिकेच्या महापौर मायादेवी महादेव परदेशी यांनी बुधवारी जालना शहराला सदिच्छा भेट देत जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोन्ही महापौरांमध्ये शहर विकास, महानगरपालिकेचे कामकाज आणि नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध नागरी सुविधांबाबत स्नेहपूर्ण वातावरणात चर्चा झाली.

महापौर वंदना मगरे यांनी धुळेच्या महापौर मायादेवी परदेशी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांचा सत्कार करून महापौरपदाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या भेटीदरम्यान दोन्ही शहरांमधील विकासकामे, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते, नागरिकांच्या विविध समस्या तसेच महानगरपालिकेच्या



माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या लोकहिताच्या उपक्रमांवर चर्चा झाली. महिला आणि दिव्यांग नागरिकांसाठी अधिक प्रभावीपणे कोणते उपक्रम राबविता येतील, याबाबतही विचारांची देवाणघेवाण झाली. महापौर वंदना मगरे यांनी जालना महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची आणि उपक्रमांची माहिती महापौर मायादेवी परदेशी यांना दिली.

महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले. शहरातील नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी विविध महानगरपालिकांमधील लोकप्रतिनिधींनी आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करणे उपयुक्त ठरू शकते, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

महापौर मायादेवी परदेशी यांनी जालना महापौर वंदना मगरे यांच्यासोबत झालेल्या भेटीबद्दल आनंद व्यक्त केला. दोन्ही महानगरपालिकांच्या कामकाजातील अनुभव, शहर विकासातील आव्हाने आणि नागरिकांच्या अपेक्षा याबाबत संवाद साधण्याची संधी या भेटीतून मिळाल्याचे त्यांनी सांगितले. धुळे आणि जालना या दोन्ही महानगरपालिकांसमोर शहराच्या वाढत्या गरजा, नागरी सुविधा आणि विकासकामांशी संबंधित विविध आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींमध्ये संवाद आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास नागरिकांच्या हितासाठी नवीन उपक्रमांना चालना मिळू शकते, असा सूर या भेटीत उमटला. महापौर वंदना मगरे यांनी मायादेवी परदेशी यांना धुळे महापौरपदाच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली चांगले लोकहिताचे काम घडावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. दोन्ही महापौरांच्या या सदिच्छा भेटीत राजकीय चर्चेपेक्षा शहर विकास, नागरिकांचे हित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून प्रभावी नागरी सेवा देण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे ही भेट जालना आणि धुळे महानगरपालिकांमधील स्नेहपूर्ण संबंधांना बळ देणारी ठरल्याचे मानले जात आहे.

# नागेश आडगावकरांच्या सुरेल सुरांनी माणिक मोती संगीत महोत्सवात रंगली भक्तिरसाची मैफल!

**जालना - प्रतिनिधी**

पद्मविभूषण उस्ताद राशीद खाँ साहेब यांचे पट्टशिष्य पं. नागेश आडगावकर यांच्या अप्रतिम व भावपूर्ण गायकीने 'माणिक मोती' संगीतोत्सवात सुरांची अविस्मरणीय मैफल रंगली. अभंगवाणी, नाट्यसंगीत आणि रागदारी संगीताच्या त्रिवेणी संगमाने जालनेकर रसिकश्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कै. माणिकराव शंकरराव अग्निहोत्री (सेवलीकर) यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रविवारी सायंकाळी जेईएस महाविद्यालयाच्या चुन्नीलाल जी. गोयल सभागृहात या भव्य संगीतोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ.




विनायक सेवलीकर यांनी केली. कार्यक्रमाची सुरुवात पं. नागेश आडगावकर यांनी 'राम कृष्ण हरी, जय जय राम कृष्ण हरी' या नामघोषाने केली. त्यानंतर 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी', 'समाधी साधन संजीवन नाम', 'पाहू द्या रे मज विठोबाचे मुख' आणि 'घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे' या अभंगांच्या भावपूर्ण सादरीकरणातून त्यांनी रसिकांना विठ्ठलभक्तीत तल्लीन केले. त्यांच्या प्रभावी स्वरविस्तार आणि हरकतींनी प्रत्येक रचनेला विशेष उंची प्राप्त करून दिली. अभंगवाणीनंतर त्यांनी 'देवाघरचे ज्ञात कुणाला' हे लोकप्रिय नाट्यगीत शास्त्रीय ढंगात सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. तसेच 'एकच रे मागणी तुझ्या पायी देवा', 'समयासी सादर व्हावे', 'धरुनीया पदराला ओढू नको रे नंदलाला' आणि 'बाळ सगुण गुणाचे तान्हे, बाळ दिसते गोजिरवाणे ग' या विविध भावछटा उलगडणाऱ्या रचनांनी सभागृहात भावपूर्ण वातावरण निर्माण केले. मैफिलीचा समारोप पं. आडगावकर यांनी 'आज राधा ब्रिज को चली' या भैरवीने केला. त्यांच्या प्रत्येक सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत टाळ्यांचा कडकडाट केला. या सुरेल मैफिलीत रोहित खवले (पखवाज), वेदांत कुलकर्णी (तबला), डॉ. प्रसाद चौधरी (संवादिनी), पंकज शिरभाते (व्हायोलिन) आणि निरंजन भालेराव (बासुरी) यांनी अप्रतिम साथसंगत करून कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी उगले यांनी केले, तर डॉ. सुजाता देवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष फुलचंद भक्कड, उद्योजक सुनील रायठठ्ठा, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. विनायक सेवलीकर, संजय परळीकर, सुभाष कुलकर्णी, अरविंद देशपांडे, नितीन देशमुख, सौ. किरण देशपांडे, विनायक कुलकर्णी, शाहीर आप्पासाहेब उगले, डॉ. यशवंत सोनुने, प्रा. कल्याण उगले यांच्यासह शहरातील संगीतप्रेमी व रसिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंठा नगर पंचायत मध्ये आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा २०२६ व सेवा संकल्प अभियानांतर्गत मंठा नगर पंचायत यांच्या वतीने शहरातील सफाई मित्रांच्या आरोग्याची काळजी घेत विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहराची स्वच्छता राखण्यासाठी दररोज महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई मित्रांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात सफाई मित्रांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये




रक्तदाब, रक्तातील साखर, वजन तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. आरोग्याशी संबंधित काही तक्रारी आढळून आल्यास संबंधितांना डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दैनंदिन कामकाजात आरोग्याची काळजी कशी घ्यावी, स्वच्छता काम करताना कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही आरोग्य कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

सफाई मित्र हे शहरातील स्वच्छता (पान २ वर)

# वारंवारच्या सुनावणी पुढे ढकलण्यावरून उच्च न्यायालय संतप्त; आम्ही न्यायाधीश आहोत की माहिती केंद्रावरील कारकून?

**जालना - प्रतिनिधी**

फौजदारी अपिलांमध्ये वकिलांकडून पेपर बुक (खटल्याशी संबंधित कागदपत्रांची प्रत) मिळाले नसल्याचे कारण पुढे करत वारंवार सुनावणी पुढे ढकलण्याच्या (तारीख मागण्याच्या) प्रवृत्तीवर अलाहाबाद उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अशा प्रकारांमुळे न्यायालयाचा अमूल्य वेळ वाया जात असून, न्यायदानाची जबाबदारी असलेल्या न्यायाधीशांना न्यायमूर्तींपेक्षा 'उच्च दर्जाचे कारकून' (ग्लोरिफाइड क्लर्क) म्हणून काम करावे लागत असल्याचे संतप्त ताशेरे न्यायालयाने ओढले.

न्यायमूर्ती सलील कुमार राय आणि न्यायमूर्ती पदम नारायण मिश्रा यांच्या खंडपीठासमोर २०२३ मधील दोन परस्परसंबंधित फौजदारी अपिलांची सुनावणी सुरू असताना हा प्रकार समोर आला. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी पेपर बुक मिळाले नसल्याचे सांगत पुढील तारीख देण्याची विनंती केली. न्यायालयाने कागदपत्रांची पडताळणी केली असता, हे पेपर बुक आधीच २१ जुलै रोजी तयार झाल्याचे स्पष्ट झाले. तरीही ५ ऑगस्ट रोजी सुनावणीवेळी वकिलांनी आपल्याला याची कोणतीही माहिती नसल्याचा दावा केला. यावर नाराजी व्यक्त करताना खंडपीठाने म्हटले की, सुनावणीसाठी सूचीबद्ध होणाऱ्या तब्बल ८० टक्के फौजदारी प्रकरणांमध्ये वकील पेपर बुक मिळाले नाही किंवा ते तयार झाल्याची माहिती नव्हती, असेच कारण पुढे करून कामकाज पुढे ढकलण्याची मागणी करतात. हा प्रकार न्यायालयाचा दर्जा खालावणारा असून न्यायालयाला एका नोकरशाही चौकशी केंद्राचे स्वरूप आणतो, अशी खंतही न्यायालयाने व्यक्त केली. वकिलांवर कोणताही थेट आक्षेप न घेता, पेपर बुक तयार झाल्याची माहिती नव्हती हा केवळ सुनावणी टाळण्याचा बहाणा वाटतो, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयाच्या या भूमिकेवर बोलताना विधिज्ञ ॲड. महेश धनावत यांनी सांगितले की, ''न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता अत्यंत रास्त आणि विचार करायला लावणारी आहे. न्यायव्यवस्थेवरील खटल्यांचा वाढता भार आणि प्रलंबित प्रकरणे पाहता सुनावणीत वारंवार तारखा मागणे हे पक्षकारांवरही अन्याय करणारे ठरते. पेपर बुक वेळेत मिळणे ही प्रशासकीय प्रक्रिया असली, तरी वकिलांनीही स्वतःहून प्रकरणाचा पाठपुरावा ठेवून न्यायालयीन वेळेचा आदर राखणे गरजेचे आहे. प्रशासकीय पारदर्शकता आणि वकिलांची तत्परता यातूनच अशा अनावश्यक विलंबाला आळा घालता येईल.'

# मागासवर्गीयांच्या योजनांतील जाचक अटी रद्द करा; रिपब्लिकन सेनेचा उपोषणाचा इशारा

## ट्रॅक्टर, स्वाधार व बीज भांडवल योजनेतील अटी शिथिल करण्याची मागणी; समाजकल्याण आयुक्तांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

मागासवर्गीय शेतकरी गट, विद्यार्थी आणि लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमधील जाचक अटी रद्द करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने लाभ देण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा नेते लिंबाजी वाहुळकर यांच्या अध्यक्षतेखाली समाजकल्याण आयुक्त कार्यालय, जालना येथे निवेदन देण्यात आले.

ट्रॅक्टर योजनेतील ९० टक्के अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकरी गटातील प्रत्येक




सदस्याकडून तहसीलदार रहिवासी प्रमाणपत्र मागितले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही अट शिथिल करून प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील जाचक अटी कमी करून गरजू विद्यार्थ्यांना सहज लाभ मिळावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. स्वाधार योजना अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना निवास, भोजन व शैक्षणिक सुविधांसाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी राबविली जाते. महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या बीज भांडवल योजनेचे अर्ज तातडीने स्वीकारून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला. यावेळी लिंबाजी वाहुळकर, डॉ. सुशील सूर्यवंशी, समाधान खरात यांच्यासह कार्यकर्ते व लाभार्थी उपस्थित होते.

# पोलीस अधिकाऱ्यावरील कारवाई रद्द: उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**जालना - प्रतिनिधी**

माहिती अथवा पूर्वसूचना नसताना कारवाई न घडल्यास त्या कृतीला कर्तव्यचुकारपणा किंवा निष्काळजीपणा म्हणता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्वाळा अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती अरिंदम सिन्हा आणि न्यायमूर्ती सत्यवीर सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, पोलीस यंत्रणा ही प्राप्त माहितीच्या आधारेच प्रत्यक्ष कृती करत असते; त्यामुळे कोणतीही गोपनीय माहिती किंवा इनपुट नसताना कारवाई न होणे याला कर्तव्यात कसूर ठरवता येत नाही. या महत्त्वपूर्ण निष्कर्षासह न्यायालयाने संबंधित पोलीस अधिकाऱ्याला ठोठावण्यात आलेली निंदा शिक्षेची नोंद आणि ती कायम ठेवणारा प्रशासकीय लवादाचा आदेश पूर्णपणे रद्दबातल ठरवला आहे. प्रकरणाच्या पार्श्वभूमीनुसार, याचिकाकर्ते पोलीस अधिकारी तत्कालीन चौकी प्रभारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यक्षेत्रात ७ नोव्हेंबर २०२३ रोजी शादाब नावाच्या व्यक्तीच्या घरावर छापा टाकून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर फटाके आणि स्फोटक साठा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम २८६ आणि स्फोटक पदार्थ कायद्याच्या कलम ९-ब(१)(अ) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपासाची जबाबदारी अन्य उपनिरीक्षकाकडे सोपवण्यात आली होती. दरम्यान, २२ जानेवारी २०२४ रोजी शादाबच्या घरात अचानक भीषण स्फोट झाला. या स्फोटात घराचा सिमेंटचा स्लॅब कोसळून दोन निष्पाप बालकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेनंतर प्रशासनाने, पूर्वी जप्ती झालेली असतानाही शादाबने पुन्हा स्फोटक साठा कसा गोळा केला यावर चौकी प्रभारींनी पाळत ठेवली नाही व वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले नाही, असा ठपका ठेवत त्यांच्यावर कर्तव्यचुकारपणा, बेशिस्त आणि मनमानी कारभाराचा आरोप ठेवून निंदा नोंदची शिक्षा सुनावली. या कारवाईविरुद्ध संबंधित अधिकाऱ्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात युक्तिवाद करताना अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, ते मूळ गुन्ह्याचे तपास अधिकारी नव्हते आणि स्फोटकांच्या पुनर्साठ्याबाबत त्यांच्याकडे कोणतीही पूर्वसूचना अथवा गोपनीय बातमी प्राप्त झाली नव्हती. उलटपक्षी, घटनेनंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आवश्यक ती सर्व पावले उचलली होती.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नमूद केले की, स्फोटकांचा नवा साठा केला जात असल्याची कोणतीही माहिती किंवा गुप्तवार्ता पोलीस चौकीला मिळाली होती, असा एकही पुरावा शासन दरबारी सादर करू शकलेले नाही. माहितीच उपलब्ध नसताना अधिकाऱ्याने कारवाई केली नाही म्हणून त्याला निष्काळजीपणा म्हणता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने याचिका मंजूर केली आणि अधिकाऱ्यावरील सर्व दंडात्मक नोंदी फेटाळून लावल्या.

या ऐतिहासिक निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना विधीतज्ज्ञ ॲड. महेश धनावत म्हणाले की, ''अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निकाल पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीला न्याय देणारा आणि तार्किक वास्तव मांडणारा आहे. अनेकदा एखाद्या दुर्दैवी घटनेनंतर स्थानिक पोलीस यंत्रणेवर निष्काळजीपणाचा शिक्का मारून कनिष्ठ अधिकाऱ्यांना बळीचा बकरा बनवले जाते. परंतु कायद्यानुसार, गुप्तवार्ता किंवा पूर्वमाहिती नसताना घडलेल्या अप्रत्यक्ष बाबींसाठी थेट अधिकाऱ्याला दोषी धरणे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांशी विसंगत ठरते. गुप्त माहितीच्या अभावाला कर्तव्यातील कुचराई ठरवता येणार नाही, हा न्यायालयाचा निर्वाळा कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्यांचे नैतिक धैर्य वाढवणारा ठरेल.

# माँ त्रिपुरा सुंदरी संस्थान पांगरी गोसावी येथे २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान भव्य 'श्री गीता-रामायण सत्संग सोहळा'

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर - मंठा विधानसभेतील पावन तिर्थक्षेत्र पांगरी गोसावी येथील माँ त्रिपुरा सुंदरी देवी संस्थान येथे २ ऑक्टो. ते ४ ऑक्टो. २०२६ दरम्यान रोज स. १० ते १ या वेळेत तीन दिवसीय भव्य-दिव्य 'श्री गीता रामायण सत्संग सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. या अध्यात्मिक ज्ञानयज्ञात अखिल भारतीय चैतन्य साधक परिवाराचे अध्यक्ष तथा गादीपती, अखिल भारतीय संत समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष परमपूज्य श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज (श्री वृंदावन धाम पाल) हे कथा व्यास म्हणून भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या सुश्राव्य



मुखारविंदातून श्रीमद्भगवद्गीता आणि प्रभु श्रीरामचंद्रांच्या पावन चरित्राचे निरूपण केले जाणार आहे. या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान माँ त्रिपुरा सुंदरी संस्थानचे तथा नारायण मठ, सुरत चे अध्यक्ष महंत स्वामी विश्वेश्वरानंद जी महाराज भूषविणार आहेत. अखिल भारतीय चैतन्य साधक परिवाराचे संस्थापक ब्रह्मलीन प.पू. संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांच्या पावन प्रेरणेने हा सोहळा संपन्न होत आहे. तसेच श्री महंत विश्वेश्वरानंदगिरी गुरु महंत शामल हरी गिरी (मठाधिपती - त्रिपुरा सुंदरा देवी संस्थान, पांगरी गोसावी, तथा नारायण मठ, सुरत) व श्री महंत विठ्ठलगिरी महाराज (पीठाधीश्वर - गोखुरेश्वर संस्थान, पांगरी गोसावी) आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, आयुष्यामान भारत मिशन चे महाराष्ट्र प्रमुख श्री. ओमप्रकाश शेटे, माजी केंद्रीय मंत्री व जालना चे माजी खासदार रावसाहेब दानवे, परतूर -मंठा विधानसभेचे आ. बबनराव लोणीकर, जालना विधानसभेचे (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.